# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३४/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. श्रीधर देरण्णा पुजारी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी मालमत्ता (एफ /उत्तर विभाग) बृहन्मुंबई** महानगरपालिका, सहा. आयुक्त यांचे कार्यालय, एफ/उत्तर विभाग, दुसरा मजला, ९६ भाऊ दाजी मार्ग, मांटूगा(पूर्व) मुंबई -४०० ०१९

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एफ/उत्तर विभाग**
महानगरपालिका, सहा. आयुक्त यांचे कार्यालय, एफ/उत्तर विभाग, दुसरा मजला, ९६ भाऊ दाजी मार्ग, मांटूगा(पूर्व) मुंबई -४०० ०१९

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ३२७३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १२७५/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. २५.११.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी ज्यावेळी माहितीचा अर्ज सादर केला होता त्यावेळेची उपलब्ध माहिती अपिलार्थींना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी व असे करते वेळी त्रयस्थ पक्षासंबंधी माहिती व त्रयस्थ पक्ष यांनी सादर केलेली माहिती देण्याअगोदर कलम (११) प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १४.०२.२०२० रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मालमत्ता (एफ/उत्तर विभाग) बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त, एफ/ उत्तर विभाग यांचे कार्यालय, माटुंगा (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. २४.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मालमत्ता (एफ/उत्तर विभाग) बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त, एफ/ उत्तर विभाग यांचे कार्यालय, माटुंगा (पूर्व), मुंबई यांच्याकडून दि. १३.०३.२०२० रोजीचा अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दि. १३.०३.२०२० मध्ये नमुद केले की, या कार्यालयाने तक्रारदार श्री. श्रीधर देरण्णा पुजारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारणा केलेल्या एकूण १३ अभिलेखी (Attorny) यांना क्र.स.आ./एफ-उत्तर/३३०७१/प्र.अ. (मालमता) दि. १३.०१.२०२० व दि. २०.०१.२०२० अन्वये कलम (११) प्रमाणे त्रयस्त व्यक्तीस माहिती देण्याबाबत विचारणा करण्यात आली

..२/-

होती. त्या अनुषंगाने संबंधीत एकूण १३ अभिलेखी (Attorny) यांनी दि. २०.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अर्जदार श्री. श्रीधर देरण्णा पुजारी हे त्यांच्या कागदपत्रांचा दुरुपयोग करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, त्यांनी संबंधीत खोली बाबतची कागदपत्रे / माहिती कोणत्याही त्रयस्त व्यक्तीस देण्यास नकार दर्शविलेला आहे. त्या अनुषंगाने तक्रारदार श्री. श्रीधर देरण्णा पुजारी यांना या कार्यालयाने क्र.स.आ./एफ-उत्तर/२७५६६/माल.अधि. दि. १२.०३.२०२० रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, जेव्हा १३ लोकांना पात्र भाडेकरु म्हणून घेण्यात आले आहे तेव्हा त्यांना का घेण्यात आले नाही, याविषयी केलेले अनेक निवेदनावर कारवाई करण्यात येत नाही. म्हणून त्यांनी माहिती अर्जाव्दारे विचारले की, १३ लोकांनी कोणते कागदपत्रे सादर केले व त्यांना पात्र ठरविण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांनी सन- १९६४ पासूनची माहिती मागितली जेव्हा सदर योजना सन १९८५ पासून अंमलात आली.

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जात ३ मुद्दे होते. जरी जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये त्यांना मुद्दा क्र. 'ए' व 'बी' ची माहिती नाकारली. परंतु, मुद्दा क्र. 'सी' (Demand Resister) विषयी काही कळविण्यात आले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दि. २५.११.२०१९ रोजीचे आदेशानंतर कोव्हिडच्या प्रादुर्भावामुळे तक्रारकर्ता यांना माहिती देण्यास उशीर झाला व मुद्दा क्र. 'सी' विषयी अभिलेख तपासून सांगू शकतील की माहिती देण्यात आली किंवा नाही. त्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १९.११.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०८.१०.२०२५**

8-10-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**